"50% DISCOUNT AVAILED"

# पुणे महानगरपालिका

(यापुढील पत्रव्यवहार खालील क्रमांक व दिनांक यांच्या उल्लेखासह करावा )
(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे. )

बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५

## बांधकाम चालू करण्याकरिता दाखला (संमती नकाशासह)
## कमेन्समेन्ट सर्टिफिकेट

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र नगररचना अधिनियम , १९६६ चे कलम ४४/४५/५८/६९ यांतील आणि महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन अॅक्ट चे कलम २५३ व २५४ यांतील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे

**FAST TRACK CC**

प्रकरण दिनांक : KTS/0004/21 — क्रमांक : CC/1267/21

Proposal Type : Residential — FAST TRACK PROPOSAL — दिनांक : 12/08/2021

Case Type : New

Project Type : Proposed Building

POONA MUNICIPAL CORPORATION BUILDING CONTROL DEPARTMENT APPROVED

श्री / श्रीमती ASSOCIATED RECONS LLP THROUGH KEDAR SABNE (POA) व्दारा आर्कटेक्ट / ला. स. श्री SIDDHARTH S HARISCHANDRAKAR यांस राहणार पुणे, पेठ महाराष्ट्र नगररचना अधिनयम, १९६६ चे कलम ४४/४५/५८/६९ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका,अधिनियम सन १९४९ चे कलम २५३ व २५४ प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सीमेतील पेठ Kothrud-South घरांक सर्वे न 26 सी. सं. न. 536 हिस्सा नं ______ फायनल प्लॉट क्र ______ प्लॉट क्र 50 सोसायटी येथे विकास करण्यासाठी आपण महानगरपालिकेकडे दिनांक 28/04/2021 रोजी प्रस्ताव दाखल केला आहे.

### -: अटी :-

१. सदर प्रस्तावातील दर्शविण्यात आलेली दर्शनी अंतरे / रस्ता प्रमाणरेषा पर्यंतचे क्षेत्र पुणे म.न.पा. च्या सुचनेनुसार भविष्यात सार्वजनिक रस्त्याचा भाग राहणार आहे.

२. कोणत्याही नवीन इमारतीचा अथवा वाढीव/दुरूस्त इमारतीचा वापर अथवा वापरासाठी परवानगी वा ताबा हा कोणत्याही व्यक्तीद्वारे पुणे म.न.पा.च्या भोगवटापत्र प्राप्त झाल्याशिवाय करण्यात येऊ नये.

३. सदर संमतीपत्राची/विकास परवानगीची मुदत (काम सुरूझालेले नसल्यास)संमतीपत्राचे दिनांकापासून १ वर्षाची राहील.(सोबतचा संमती नकाशा हया संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजणेत येईल.)

४. सदर संमतीपत्र हे मुदत संपल्यानंतर प्रत्येक वर्षी नूतनीकरण करणे आवश्यक आहेअसे नूतनीकरण सलग तीन वेळा करता येईल.तसे न झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये नवीन अर्ज करून संमती घ्यावी लागेल.एम.आर.टी.पी. कलम ४८ अन्वये संमतीपत्राची वैधता राहील.

५. सदरचे संमतीपत्र हे पुढील अटींचा भंग झाल्यास रद्द करण्यास पात्र राहील.

(अ) जागेवरील विकसन बांधकाम हे मान्य नकाशाप्रमाणे दर्शविलेल्या/संमत केलेल्या वापरानुसार होत नसल्यास अथवा सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम/अनधिकृत वापर चालू असल्यास अटींचा भंग समजण्यात येईल.

(आ) सदर बांधकाम प्रस्तावातील संदर्भातील नमूद केलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्यास/झाले असल्यास, पुणे म.न.पा.ने घातललेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास, अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.

(इ) अर्जदाराने सदरची परवानगी ही गैरकृत्य करून पुणे म.न.पा.चे दिशाभूल करून प्राप्त केलेली आहे,असे निदर्शनास आल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.६.१० महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशनअॅक्ट कलम २५८ अन्वये सदरची परवानगी दिशाभूल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.

(ई) अर्जदार आणि जो इसम हा स्वतःकिंवा त्याच्याद्वारे मालकी हक्काचा दावा करून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनयम,१९६६ चे कलम ४२ व ४५ अन्वये असलेल्या तरतुदीचे उल्लंघन करून जमिन विकसन अथवा बांधकाम करत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची परवानगी दिशाभूल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.

६. सदर संमतीपत्रावरील/लगत असलेल्याअटी व सूचना या केवळ अर्जदारास नव्हे तर भविष्यातील अर्जदाराचे सर्व वालीवारस,मुखत्यारधारक,व्यवस्थापक,प्रशासक, वारसदार आणि प्रत्येक इसम जो अर्जदाराच्या द्वारा मालकी हक्क सिध्द करेल त्या सर्वांस कायमस्वरूपी बंधनकारक राहील.